काव्यतीर्थ या उपाधीने गौरविले गेलेले संस्कृत साहित्यिक

डॉ. देवीप्रसाद खंडेराव खरवंडीकर

काव्यतीर्थ या उपाधीने गौरविले गेलेले संस्कृत साहित्यिक डॉ. देवीप्रसाद खंडेराव खरवंडीकर यांचा जन्म १ ऑक्टोबर १९३५ रोजी नगर येथे झाला. देवीप्रसाद खरवंडीकर यांचे बालपण व शिक्षण नगरमध्येच गेले. खरवंडीकरांनी अहमदनगर महाविद्यालयात दीर्घकाळ संस्कृत आणि प्राकृत विषयांचे अध्यापन केले. प्राध्यापक म्हणून कार्यरत असतानाच त्यांनी संगीताचाही सखोल अभ्यास चालू ठेवला. त्यांनी १९७६ साली अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाची 'संगीत अलंकार' ही पदवी संपादन केली.

गेली ४५ वर्षे डॉ. खरवंडीकर हे 'गुंजारव' या संस्कृत त्रैमासिकाचे प्रमुख संपादक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी संस्कृतविषयक विपुल लेखनही केले आहे. त्याचबरोबर त्यांनी संगीत शिकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना आणि संगीत अभ्यासकांना मार्गदर्शन होईल असे संगीतविषयक लेखनही केले आहे. 'हाथरस'चे संगीत प्रकाशन, रोहिणी मासिक आणि बऱ्याच वृत्तपत्रांमधून त्यांचे संगीतविषयक लेख प्रसिद्ध झाले असून 'संगीत कला विहार' मासिकातही त्यांचे लिखाण प्रसिद्ध झाले आहे. याशिवाय संगीत महाभारती, मुंबईच्या सांगीतिक ज्ञानकोशासाठी त्यांनी योगदान दिले आहे.

डॉ. खरवंडीकर आकाशवाणीचे मान्यताप्राप्त गायक असून त्यांनी गायनाचे कार्यक्रम आकाशवाणीवरून सादर केले आहेत. संगीत विषयाला अनुसरूनही त्यांनी विविध कार्यक्रम सादर केले आहेत. अहमदनगर येथे डॉ. खरवंडीकर यांच्या सुविद्य पत्नी कीर्तिदेवी यांनी स्थापन केलेल्या 'श्रुती संगीत निकेतन' या संगीत विद्यालयातर्फे विशारद, अलंकारच्या, तसेच एम.ए. पर्यंतच्या विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या 'अलंकार'पर्यंतच्या परीक्षांचे अहमदनगर येथील केंद्र संचालक म्हणून ते गेली २५ ते ३० वर्षे कार्यरत आहेत. तसेच, अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळातर्फे आयोजित होणाऱ्या 'अलंकार'च्या विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच्या शिबिरात ज्येष्ठ संगीतज्ञ म्हणून डॉ. खरवंडीकरांनी ठिकठिकाणी अनेक वेळा मार्गदर्शन केले आहे.

'भारतीय संगीताचा इतिहास व विकास' या पाठ्यपुस्तकाचे त्यांनी अन्य सहकाऱ्यांसह लेखन केले आहे. पुणे विद्यापीठाच्या पदविका परीक्षेत संगीत विषयासाठी डॉ. खरवंडीकरांनी बी. एल. मोडक हे पारितोषिक पटकाविले. याशिवाय त्यांनी महाराष्ट्र शासनातर्फे १९९८ मध्ये संस्कृत पंडित, संस्कृत नाट्यलेखनाचे आकाशवाणीचे पुरस्कार संस्कृत बालसाहित्यासाठी दोनदा, एन.सी.ई.आर.टी. ची पारितोषिके त्यांनी प्राप्त केलेली आहेत. संस्कृतमधील लेखनकार्यासाठी २००९ सालचा राष्ट्रपती पुरस्कार त्यांना प्राप्त झाला.

नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे 'ज्ञानगंगा घरोघरी' हे बोधवाक्य खरवंडीकरांनीच सुचवले होते, असे म्हणतात. संस्कृत चर्चासत्रांच्या कामानिमित्ताने भारतात आणि जगातील कॅनडा, जर्मनीसारख्या संस्कृत भाषेचे महत्त्व जाणणाऱ्या देशांना त्यांनी अनेकदा भेटी दिल्या आहेत. त्यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त, त्यावेळी ९५ वर्षे वयाचे असणाऱ्या नागपूरच्या ना. वा. गोखले यांनी सौवर्णानि सरोजानि निर्मातुं सन्ति शिल्पिनः। देवीप्रसादरूपेण शिल्पी त्वं सौरभाय हि।।'' असे उद्गार काढले होते.

धनंजय हे डॉ. खरवंडीकरांचे मोठे चिरंजीव आहेत आणि कविता त्यांची ज्येष्ठ स्नुषा होत. त्यांचे दुसरे चिरंजीव मकरंद खरवंडीकर हे उत्तम हार्मोनियम वादक असून अनेक कलाकारांना त्यांनी साथ केली आहे. त्यांच्या सूनबाई डॉ. धनश्री खरवंडीकर या गायिका असून त्या नगर येथील श्रुती संगीत निकेतनच्या संचालिका तसेच संस्कार भारती, अहमदनगरच्या उपाध्यक्षा असून त्या ज्येष्ठ गायिका अभिनेत्री स्वर्गीय जयमाला शिलेदार यांच्या शिष्या आहेत. धनश्री खरवंडीकर यांनी नाट्यसंमेलनाच्या विद्यमान अध्यक्ष कीर्ती शिलेदार यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्यसंगीतात डॉक्टरेट केलेली असून अनेक संगीत नाटकांमधून भूमिका केल्या आहेत.

मुंबईतील सात रेल्वे स्थानकांवर 'वुलू लेडीज पावडर रूम' सुरू होणार

■ मुंबई

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने मुंबईतील ७ प्रमुख स्थानकांवर 'वुलू वुमन पावडर रूम' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. हा अभिनव उपक्रम येत्या दोन महिन्यांत प्रत्यक्ष सुरू होणार असून महिला प्रवाशांना त्याचा सशुल्क लाभ घेता येणार आहे.

या वुलू वुमन पावडर रूम्स मध्य रेल्वे मार्गावरील घाटकोपर, कांजूरमार्ग, मुलुंड, ठाणे आणि हार्बर मार्गावरील लोकमान्य टिळक टर्मिनस, चेंबूर आणि मानखुर्द या स्थानकांवर २०० चौरस मीटर जागेत उभारल्या जाणार आहेत.

या पावडर रूम्स केवळ महिलांसाठी असून त्यात आरामदायी सुविधा दिल्या जाणार आहेत. स्वच्छतागृहे, वॉश बेसिन आणि आरशांनी सुसज्ज स्वच्छतापूर्ण वातावरण या पावडर रूम्समध्ये अनुभवायला मिळणार आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येकवेळच्या वापरास १० रुपये शुल्क असणार आहे. तसेच त्यासाठी ३६५ रुपये भरून वर्षासाठी नोंदणीही करता येणार आहे. या ठिकाणच्या अर्ध्या भागात ४ प्रसाधनगृहे आणि उर्वरित भागात महिलांच्या वापरासाठी असलेली सौंदर्यप्रसाधने, भेटवस्तू तसेच महिला स्वच्छता उत्पादने आदींची विक्री करण्यास परवानगी देण्यात आली आहे. अन्नपदार्थ विक्रीस मात्र बंदी घालण्यात आली आहे. या उपक्रमातून रेल्वेला ५ वर्षांमध्ये दरवर्षी ३९.४८ लाख रूपयांचा महसूल मिळण्याची अपेक्षा आहे.

पट्टणकोडोलीतील बिरदेव यात्रा १ नोव्हेंबरपासून सुरू

■ कोल्हापूर

हातकणंगले तालुक्यातील पट्टणकोडोली येथील प्रसिद्ध श्री विठ्ठल बिरदेव यात्रा यंदा पुढील महिन्यात पार पडणार आहे. ही यात्रा १ नोव्हेंबरपासून सुरू होणार असून याच दिवशी फरांडेबाबांची भाकणुक आयोजित केली आहे. यासंदर्भात पुजारी, ग्रामस्थ, धनगर समाज, हेगडे बोते आणि मानकऱ्यांची बैठक नुकतीच ग्रामपंचायत कार्यालयात पार पडली. या बैठकीत यात्रा आणि भाकणुकचा निर्णय घेण्यात आला. या यात्रेचा दिवस ठरविण्यासाठी कर्नाटकातील संकेश्वर, बुदनूर येथील शेकडो हेगडे बांधव पायी चालत दरवर्षी पट्टणकोडोलीत येत असतात. यंदाही हेगडे बांधव परंपरेप्रमाणे गुरुवारी संध्याकाळी या गावात दाखल झाले होते. यावेळी त्यांनी आणलेल्या मानाच्या दुधाच्या घागरी येथील भानस मंदिरात अर्पण करण्यात आल्या. यावेळी झालेल्या बैठकीत मानकरी नंदकुमार जोशी यांनी यात्रेचा सविस्तर कार्यक्रम जाहीर केला.

'समृद्धी'च्या ब्लास्टिंग कामामुळे धामणीतील अनेक घरांना तडे

■ नाशिक

जिल्हयातील इगतपुरी तालुक्यातील धामणी परिसरात मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाच्या कामाला वेग आला आहे. मात्र या रस्त्याच्या कामासाठी सुरुंग लावून केल्या जाणाऱ्या स्फोटामुळे (ब्लास्टिंग) धामणी गावातील अनेक घरांना मोठमोठे तडे गेले आहेत, तर काही घरांची पडझड झाली आहे.

दोन दिवसांपूर्वी या रस्त्यासाठी ब्लास्टिंग सुरू असताना गावातील शिवाजी रघुनाथ भोसले यांची ९ वर्षीय नात स्वरा बाहेर खेळत होती. त्यावेळी तिच्या बाजूलाच १० ते १२ किलोचा मोठा दगड येऊन पडला. यातून सुदैवाने स्वरा थोडक्यात बचावली. मागील ३ वर्षांपासून धामणी गावाजवळ ब्लास्टिंगचे काम सुरू असून येथील ग्रामस्थ जीव मुठीत धरून जगत आहेत. या ब्लास्टिंगमुळे गावातील शिवाजी भोसले, केशव भोसले, कचरू भोसले, संदीप भोसले, राधाकृष्ण भोसले, रमेश भोसले, गजीराम भोसले यांच्या घरांवर मोठ्या प्रमाणात दगड पडले, तर संदीप भोसले यांच्या

ग्रामस्थांच्या जीवाला धोका

पोल्ट्री फार्मवर दगड पडल्याने अनेक कोंबड्या दगावल्या.

विशेष म्हणजे नुकसान झालेल्या ग्रामस्थांनी भरपाईसाठी काँग्रेसचे उत्तमराव भोसले व धनंजय भोसले यांच्या नेतृत्वाखाली तीन दिवस उपोषण आंदोलन केले. त्यावेळी संबंधित कंत्राटदार कंपनीने लेखी आश्वासन देऊनही अद्यापपर्यंत कुणालाही नुकसान भरपाई मिळालेली नाही.

ज्येष्ठांना 'दिल्ली दर्शन' घडवा! हायकोर्टाचे आरोपींना निर्देश

■ नवी दिल्ली

दिल्ली उच्च न्यायालयाने एका प्रकरणात आरोपींना आगळीवेगळी शिक्षा देऊन एक चांगला सामाजिक संदेश दिला आहे. एका महिलेचा विनयभंग, मारहाणीचा आरोप त्यांच्यावर होता. या प्रकरणात दोन्ही बाजूंनी समझोता झाल्यानंतर एफआयआर रद्द करत न्यायालयाने तीन आरोपींना

अजब शिक्षेची चर्चा

दिल्लीतील वृद्धाश्रमात राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी ''दिल्ली दर्शन''साठी बस प्रवासाची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायमूर्ती सौरभ बॅनर्जी यांनी आरोपींना एकत्रितपणे किमान चार तासांसाठी राजधानी दिल्लीच्या वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना दिल्ली दर्शनासाठी घेऊन जाण्यासाठी भाड्याने बसची व्यवस्था करण्यास सांगितले. त्यांना दिल्ली दर्शनासाठी घेऊन जाताना प्रवासामध्ये त्यांची खाण्या-पिण्याची योग्य प्रकारे काळजी घेतली जावी. यात कुणी आजारी असेल तर त्याच्यासोबत एक वैद्यकीय परिचर असावा. त्याची आवश्यक औषधे आणि वैद्यकीय किट सोबत नेण्यास विसरू नये,'' असे न्यायालयाने निर्देश दिले.

पर्यावरणप्रेमींच्या समितीचा अहवाल येईपर्यंत 'ती' झाडे कापू नका

मंत्री मंगलप्रभात लोढांची महापालिकेला सूचना

■ मुंबई

दक्षिण मुंबईतील मलबार हिलच्या हँगिंग गार्डन परिसरातील जलाशयाची पुनर्बांधणी केली जाणार आहे. या कामासाठी ४०० झाडांची कत्तल केली जाणार आहे. मात्र याला स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींचा विरोध आहे. त्यामुळे त्यांच्याच नेमलेल्या समितीचा अहवाल येईपर्यंत ही झाडे तोडू नका, तसेच स्थानिक लोकांना बजावलेल्या नोटिसा मागे घ्याव्या, अशा सूचना मुंबईचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी पालिका आयुक्तांना एका पत्राद्वारे केल्या आहेत.

मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी पालिका आयुक्तांना पाठवलेल्या सूचनापत्रात असेही म्हटले आहे की, नवीन जलाशयासाठी सुरू असलेले काम स्थगित करावे, झाडावर चिकटलेले टॅग काढून टाकावेत, प्रस्तावित जागेतील लोकांना बजावलेल्या नोटिसा मागे घ्याव्यात आणि प्रस्तावाबाबतचे सर्व संबंधित अहवाल व विश्लेषण संकेतस्थळावर प्रदर्शित करावे. मलबार हिलच्या ब्रिटिशकालीन जलाशयाची पुनर्बांधणी केली जाणार आहे.त्यासाठी परिसरातील ४०० झाडे पालिका तोडणार आहे. मात्र ही झाडे तोडण्यास स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी विरोध केला आहे. त्यामुळे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी परिसरातील प्रतिष्ठित नागरिक आणि पर्यावरणप्रेमींची एक समिती नेमली आहे. याच समितीचा अहवाल येईपर्यंत मंत्री लोढा यांनी ही झाडे तोडू नका अशा सूचना पालिकेला केल्या आहेत.

पितृपंधरवड्यामुळे फळभाज्यांसह पालेभाज्यांचे भाव कडाडले

■ चाकण

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये पितृपंधरवड्यामुळे पालेभाज्यांची मोठी आवक होऊनही भावात वाढ झाली. कांदा, बटाटा, लसूण व हिरव्या मिरचीची प्रचंड आवक झाली. फळभाज्यांसह पालेभाज्यांचे भाव कडाडले आहेत. मेथी, कोथिंबीर, शेपू व पालक भाजीची विक्रमी आवक झाली. जनावरांच्या बाजारात जर्शी गाई, बैल, म्हैस व शेळ्या - मेंढ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली. एकूण उलाढाल ३ कोटी, ४५ लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १,००० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक ४०० क्विंटलने वाढली व कांद्याचा कमाल भाव २,४०० रुपयांवर स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक ५०० क्विंटलने वाढली व बटाट्याचा कमाल भाव २,००० रुपयांवर स्थिरावला. जळगाव भुईमूग शेंगा व बंदूक भुईमूग शेंगांची काहीच आवक झाली नाही. चाकण बाजारात मक्याची आठ टन आवक झाली. लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक ५ क्विंटलने वाढूनही लसणाचा कमाल भाव १४ हजार रुपयांवरच स्थिरावला.

हिरव्या मिरचीची एकूण आवक ४०० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक ५५ क्विंटलने वाढली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयांपासून ते ५ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that **MR. AVADHOOT MADHUKAR MENGLE** was expired on 26-02-2023 **VASAI. MR. AVADHOOT MADHUKAR MENGLE** was owner of MARUTI SUZUKI CIAZ VXI + Saloon car-Petrol bearing registration no. MH48AK2608, Model No.06-2016, Classic No. MA3EXMG1500209383. Engine No. K14BN 7126425. **MR. AVADHOOT MADHUKAR MENGLE** leaving behind his wife MRS. TANVI MENGLE being the only legal heir thus **MRS. TANVI MENGLE** desires to apply and transfer the above-mentioned vehicle in her name. So I TANVI MENGLE hereby invites claims objections within a period of 15 days from this notice any person having any kind of claim objection should contact at the address, 24, Corner View, Gokhale Road North, Sachin Hotel Building, Dadar West, Mumbai, Maharashtra Pin 400028 with copies of such documents, proofs, in support of their claims, demands etc. If no claims/objections are received within 15 days of this notice, then **I MRS. TANVI MENGLE** will be free to transfer the above vehicle of late **MR. AVADHOOT MADHUKAR MENGLE** expired on 26-02-2023 and no claims thereafter will be entertained.

-BYP-

फॉर्म ए
जाहीर उद्घोषणा
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

रेडियस ॲण्ड डिजर्व्ह बिल्डर्स एलएलपीच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता
संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	रेडियस ॲण्ड डिजर्व्ह बिल्डर्स एलएलपी
२.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक	९.८.२०११
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले	आरओसी, मुंबई
४.	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/मर्यादित दायित्व ओळख क्र.	AAA-5895
५.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता	वन बीकेसी, ए विंग, १४०१, प्लॉट क्र. सी-६६, जी ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१.
६.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक	आदेश उद्घोषणेचा दिनांक २७.९.२०२३; एनसीएलटी आदेश दि. २९.९.२०२३ रोजी प्राप्त
७.	दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक	२७.३.२०२४
८.	अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक	**पौर्णिमा जयंत तुंगटकर** **नोंद. क्र.:** IBBI/IPA-002/IP-N01188/2021-2022/13989
९.	मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल	४ए, श्री गणेश कॉम्प्लेक्स, एस. क्र. ८६/१बी/२बी, गांधीभवन रोड, कोथरूड, पुणे - ४११ ०३८. **ईमेल आयडी:** tugatkarpournima@gmail.com
१०.	अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल	प्लॉट क्र. २८, विज्ञान नगर कोऑप. सोसा., स. क्र. १७/१, बावधन खुर्द, पुणे - ४११ ०२१. (**ईमेल आयडी:** irpradius23@gmail.com)
११.	दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक	१३.१०.२०२३
१२.	अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, उप-कलम २१ च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचे वर्ग, जर असल्यास.	संकेताच्या कलम ५ (८) (एफ) च्या स्पष्टीकरणामध्ये परिभाषित केल्यानुसार ॲलॉटीज.
१३.	वर्गामधील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे	१. हेमंत मेहता **नोंद. क्र.:** IBBI/IPA-001/IP-00027/2016-2017/10060 **ईमेल :** hemant@apnh.in २. मनिष जाजू **नोंद. क्र.:** IBBI/IPA-001/IP-P00034/2016-2017/10087 **ईमेल :** mmjaju5@gmail.com ३. संजीव गोयल **नोंद. क्र.:** IBBI/IPA-001/IP-P02731/2022-2023/14211 **ईमेल :** sanjeevgoel7@gmail.com
१४.	(अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल:	वेबलिंक: https://ibbi.gov.in/en/home/downloads भौतिक पत्ता - पौर्णिमा जयंत तुंगटकर, प्लॉट क्र. २८, विज्ञान नगर कोऑप. सोसा., स. क्र. १७/१, बावधन खुर्द, पुणे - ४११ ०२१. ईमेल आयडी: irpradius23@gmail.com

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी रेडियस ॲण्ड डिजर्व्ह बिल्डर्स एलएलपीची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दि. २७.०९.२०२३ रोजी दिले आहेत.
रेडियस ॲण्ड डिजर्व्ह बिल्डर्स एलएलपीच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह १३.१०.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करु शकतात.
नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय धनकोने, फॉर्म सीएमध्ये संकेताच्या कलम ५ (८) (एफ) च्या स्पष्टीकरणामध्ये परिभाषित केल्यानुसार ॲलॉटीजच्या वर्गाचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहण्याकरिता नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्यांची पसंती नमूद करावी.
दाव्याबाबतचे कुठीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.
पौर्णिमा जयंत तुंगटकर
अंतरिम ठराव व्यावसायिक
रेडियस ॲण्ड डिजर्व्ह बिल्डर्स एलएलपी
नोंद. क्र. IBBI/IPA-002/IP-N01188/2021-2022/13989
दिनांक: २.१०.२०२३
ठिकाण: पुणे

गावाला जोडणारा एकमेव रस्ता मुसळधार पावसात वाहून गेला

■ गोवा

सांगे मतदारसंघातील डोंगरमाथ्यावर वसलेल्या काजूकोट्टो या आदिवासी गावात शनिवारी मुसळधार पावसाने हजेरी लावली. यावेळी गावात ढगफुटी समान परिस्थिती निर्माण झाली होती. तर

डोंगरावरून अचानकपणे वाहुन आलेल्या पाण्याच्या ओघात गावाला जोडणारा एकमेव रस्ता वाहून गेला. यामुळे या गावाचा इतर भागांशी संपर्क तुटला आहे. ही घटना घडली त्यावेळी बरेच विद्यार्थी शाळेत गेले होते. रस्ता वाहून गेल्याने हे विद्यार्थी गावाबाहेरच अडकुन पडले होते. ह्या घटनेची माहिती मिळताच स्थानिक आमदार आणि समाजकल्याण मंत्री सुभाष फळदेसाई यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यासोबत काजूकोट्टो गावाला भेट देऊन वाहून गेलेल्या रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या.

गेल्या चार दिवसांपासून दक्षिण गोव्यात परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. या पावसाचा फटका काजूकट्टा या आदिवासी गावाला बसला. १०६ लोकसंख्या असलेल्या या गावाला काजूकट्टा ते तिसकोंड येथे जाण्यासाठी साडेतीन किलोमीटरची पायपीट लोकांना करावी लागते. या गावामध्ये अजूनही पक्का रस्ता तयार करण्यात आला नाही. आजही या गावातील लोक डोंगर माथ्यावरिल कच्चा रस्त्याचा वापर करतात.

ब्रिटिश राजदूतांच्या मुंबईतील निवासस्थानातून बुटांची चोरी

■ मुंबई

ब्रिटनचे भारतातील राजदूत डेव्हिड मॅथ्यूज यांनी मुंबईतील आपल्या निवासस्थानातून नवे कोरे ब्रँडेड बूट चोरीस गेल्याची तक्रार वांद्रे पोलीस ठाण्यात केली आहे. मॅथ्यू यांनी ३१ ऑगस्ट रोजी आपल्या मुलासाठी ५,९९९ रुपयांत एक स्पोर्ट्स शूज विकत घेतले होते. त्यांच्या मुलाने हे बूट एकदाच वापरले होते. तेव्हापासून हे बूट त्यांच्या निवासस्थानाबाहेर शूज रॅकमध्ये ठेवले होते. मॅथ्यू हे वांद्रे पश्चिम येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोडवरील बोनी कासा इमारतीत पत्नी आणि मुलासोबत राहतात. २६ सप्टेंबर रोजी तेथील शूज रॅकमध्ये ठेवलेले बूट गायब झाले असल्याचे त्यांच्या मुलाला कळले. त्यानंतर दोघा पितापुत्रांनी बुटाची शोधाशोध केली, पण ते सापडले नाहीत. त्यामुळे त्यांनी थेट पोलिसांत तक्रार दाखल केली. वांद्रे पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद

■ पिंपरी

पिंपरी-चिंचवड शहरातील पाणीपुरवठा गुरुवारी (दि.५) बंद राहणार आहे, तर शुक्रवारी सकाळी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागकडून ही माहिती देण्यात आली आहे. निगडीतील जलशुद्धीकरण केंद्रात देखभाल दुरुस्तीचे काम करण्यात येणार असल्यामुळे शहरातील पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला आहे. निगडीतील सेक्टर क्र.२३ येथील जलशुध्दीकरण केंद्रातील पाणीपुरवठाविषयक नियमित देखभाल दुरुस्तीची आवश्यक कामे केली जाणार आहेत. त्यापार्श्वभूमीवर शहरातील पाणीपुरवठा बंद ठेण्यात येणार असल्याची माहिती सह शहर अभियंता श्रीकांत सवणे यांनी दिली. मावळातील पवना धरणातून पिंपरी-चिंचवककरांना पाणीपुरवठा केला जातो. रावेत येथील बंधा-यातून अशुद्ध जलउपसा करण्यात येतो. सेक्टर २३ निगडी येथे पाणी शुद्ध करुन शहरवासीयांना पुरवठा केला जातो. जलशुद्धीकरण केंद्रातील पाणीपुरवठा विषयक नियमित देखभाल दुरुस्ती, विविध ठिकाणी देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहेत.